# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार


MERC/ADM/RTI/009/2020/**132** Dt. 10.02.2020

प्रति,
श्री. जगनसिंह राजपूत (जेष्ठ नागरिक),
ओमसाई निवास, बॅरेक नंबर ८,
रूम नंबर ४, उल्हासनगर-१,
जि. ठाणे.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. २७.०१.२०२० रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि.२८.०१.२०२० रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | आपल्या राज्यामध्ये महाराष्ट्र विज मंडळ होते त्यावेळेस डॉक्टर, वकील व आर्किटेक्ट यांना वाणिज्य टेरीफ मधून घरगुती टेरीफ लावण्याचा लाभ देण्यात आला होता. त्याची प्रत जोडत आहे. तरी मला या तिन्ही व्यवसायीकांनी पूर्ण घर सोसायटी मध्ये असतांना घरगुती टेरीफ १७/०६/२००० च्या आदेशाप्रमाणे लावण्यात येत आहे की वाणिज्य टेरीफ याची सविस्तर माहिती जनहित व विज वितरन कंपनी महसुल हितासाठी जलद गतीने मिळावी. | आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाचे आदेश, दि. १२.०९.२०१८ च्या प्रकरण 195 चा 2017 मध्ये उपलब्ध आहे. सदर आदेश आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेले आहे. |
| २ | आपल्या विज वितरन कंपनीमध्ये गाईचा गोठा व म्हशीचा गोठाला कोणता टेरीफ लावण्यात येतो याचीही पशुहितासाठी पशुप्रेमीसाठी स्वाक्षरी प्रत मिळावी. | |
| ३ | आपल्या राज्यामध्ये विज वितरन कंपनीचे अधिकारी आपल्या हितासाठी आहे त्या टेरीफ न लावता चुकीचा टेरीफ मध्ये ग्राहकांकडून बिल वसूल करून विज वितरन कंपनीची प्रतिष्ठा मलीन करीत असतील तर ग्राहका व जनहितासाठी त्या अधिकाऱ्यांवर कोणत्या नियमाने कारवाई करण्याची मुभा ग्राहक व जनतेसाठी आहे याची स्वाक्षरी प्रत मिळावी. | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६ मध्ये उपलब्ध आहे. सदर विनियम आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेले आहेत. |

जर आपणांस प्रकरण क्र. १९५ चा २०१७ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६ चे संपूर्ण छायांकित प्रती हव्या असल्यास, माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार पुढीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची छायांकित प्रतीची एकूण पृष्ठे | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकूण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| ६६७ | २ | १३३४/- | अंदाजे रु. ३००/- | १६३४/- |
| | | | एकूण रु. | **१६३४/-** |

वरीलप्रमाणे आकारलेले शुल्क आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा आपल्या प्रतिनिधीद्वारे रोख रक्कम रू. **१३३४/-** जमा करुन शुल्क भरल्याची पावती /चलन पुरावा सत्य प्रत समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील.

माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (1) अन्वये श्री. अनिलकुमार उके, संचालक (विधी) अतिरिक्त कार्यभार /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत, पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर 1, 13 वा मजला, कफ परेड, मुंबई - 400005. टेलिफोन नं. 022-22163964/65/69 **Email: anilkumar.ukey@merc.gov.in.**

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी